आरोग्य कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र:- ८०५४
दिनांक :- ५/०३/१८

कार्यालयीन परिपत्रक

विषय- अंशदायी वैदयकीय सहाय योजनेअंतर्गत,पुणे म.न.पा. सेवानिवृत्त सेवक/सेविकांच्या हयात असलेल्या आई-वडिलांची नावे संबंधितांचे सी.एच.एस.कार्ड मध्ये समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ६/९५९ दि.१९/०१/२०१८

अंशदायी वैदयकीय सहाय योजनेअंतर्गत, पुणे म.न.पा. सेवानिवृत्त सेवक व त्यांचे पती/पत्नी यांसाठीच नियमानुसार वैदयकीय सुविधा उपलब्ध करण्यात येत होती. परंतु, मा.महापालिका आयुक्त ठराव क्रमांक ६/९५९ दि.१९/०१/२०१८ अन्वये, अंशदायी वैदयकीय सहाय योजनेअंतर्गत, पुणे म.न.पा. सेवानिवृत्त सेवक/सेविकांच्या हयात असलेल्या व त्यांचेवर अवलंबून असलेल्या आई-वडिलांची नावे, संबंधितांचे सी.एच.एस.कार्डमध्ये समाविष्ट करून, योजनेच्या अटी व शर्ती नुसार, नवीन सभासदांस वैदयकीय उपचार व औषधोपचारांमध्ये सर्व लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत.

तरी आपले विभागातून सेवानिवृत्त झालेल्या व भविष्यात सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचे हयात आई-वडिलांची नावे संबंधितांचे सेवानिवृत्ती सी.एच.एस.कार्डमध्ये समाविष्ट करणेसाठी आवश्यक कागदपत्रे खाली नमूद केलेल्या कार्यालयात सादर करणेबाबत कळविण्यात यावे.

अंशदायी वैदयकीय सहाय योजना विभाग
खोली क्रमांक ३४५, तिसरा मजला,
पुणे महानगरपालिका मुख्य इमारत,
पुणे ४११००५
०२०-२५५०१२३४

कळावे.

(डॉ.अंजली साबणे)
सहा.आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका.

प्रत-
१)सर्व मा.खातेप्रमुख
२)सर्व मा.उपायुक्त परिमंडळ क्रमांक १ ते ५
३)सर्व मा.महापालिका सहायक आयुक्त क्रमांक १ ते १५
पुणे महानगरपालिका